# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट :- ४३१/२०२३ दिनांक - १६/१२/२०२३

## घर विकत देतो असे सांगुन फसवणुकीचे गुन्हे करणाऱ्या आरोपीला अटक करुन ३ गुन्हे उघड करण्यास वालीव गुन्हे प्रकटिकरण शाखेला यश

वालीव पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात दि. १४/३/२०१८ रोजी ते दि. १४/३/२०२२ पावेतो आरोपीत वैकुंठ मिश्रा याने त्याचे मालकिची जनकल्यान इंटरप्रायजेस, खोरपीपाडा वाकीपाडा येथील ३०० स्क्वेअर फुटाची रुम ही फिर्यादीस ४,००,०००/- रुपये मध्ये देतो असा व्यवहार ठरवुन फिर्यादीकडुन वेळोवेळी चेकद्धारे एकुण २,५०,०००/- रुपये घेवुन फिर्यादीस आजपावेतो रुम ही दिली नाही व पैसे पण परत न करता फिर्यादीची जाणीवपुर्वक आर्थिक फसवणूक केली म्हणुन फिर्यादी यांनी तक्रार दिले वरुन वालीव पोलीस ठाणेत गु.र.क्र. २८७/२०२२ कलम ४२० भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हा घडल्यापासुन आरोपीत हे भुमीगम झाला होता. आरोपीत याने त्याचे सर्व भ्रमणध्वनी क्रमांक बंद केले होते. गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने तांत्रीक विश्लेषणाचे आधारे तसेच गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे गुन्हयाचा तपास केला असता. आरोपी नामे वैकुंठ ब्रिजराज मिश्रा, रा. कॉसमस बिल्डींग, विरार पश्चिम यास अटक केली व त्याचेकडे केलेल्या चौकशीत त्याने अनेक इसमांना फसवले असुन पोलीस अटक करण्याचे भितीने व पिडीत इसम मारहाण करतील या भितीने मागील २ वर्षापासुन तो त्याचे राहते घरातुन बाहेर पडला नसल्याचे सांगितले. आरोपीत याने वालीव व नायगाव पोलीस ठाण्याचे अभिलेखावरील खालील गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहेत.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गु.र.क्र. व कलम |
|---|---|---|
| १. | वालीव | गु.र.क्र. २८७/२०२२ कलम ४२० भा.दं.वि. |
| २. | नायगाव | गु.र.क्र. १७८/२०२३ कलम ४२० भा.दं.वि. |
| ३. | नायगाव | गु.र.क्र. ८७२/२०२२ कलम ४२० भा.दं.वि. |

वरील कामगिरी श्रीमती पौर्णिमा चौघुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ- २ वसई, श्री. विनायक नरळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, वालीव पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जयराज रणवरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. जिलानी सय्यद यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे स.पो.नि. सचिन सानप, पो.हवा. मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, बाळु कुटे, पो.अं. विनायक राऊत, अभिजीत गढरी यांनी यशस्वीरित्या कामगिरी पार पाडली आहे.

--------------ooooo--------------